'जीवदान' कादंबरी प्रकाशित

सटाणा : येथील ज्येष्ठ साहित्यिक, भाषातज्ज्ञ, समीक्षक तथा भाषा, कला, लोकजीवन, लोकसंस्कृती यांचे अभ्यासक डॉ. सुधीर देवरे यांची 'जीवदान' कादंबरी पुण्याच्या राजहंस प्रकाशनातर्फे नुकतीच प्रकाशित झाली. या पुस्तकासह डॉ. देवरे यांची आतापर्यंत ३२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

'जीवदान' कादंबरीत मोठ्या प्रमाणात अहिराणी बोली उपयोजित झाली आहे. अहिराणी या आपल्या बोलीभाषेवर डॉ. देवरे यांचे विलक्षण प्रेम असून या भाषेचा अभ्यासही त्यांनी केला आहे. डंख व्यालेलं अवकाश', 'आदिम तालनं संगीत', 'कला आणि संस्कृती', 'पंख गळून गेले तरी', 'अहिराणी लोकपरंपरा', 'अहिराणी गोत', 'अहिराणी वट्टा', अहिराणी लोकसंस्कृती', 'अहिराणीच्या निमित्तानेः भाषा', 'अहिराणी', 'भाषा', आणि बरेच साहित्य डॉ.देवरे यांची याआधीची ग्रंथसंपदा आहे.

कीटकनाशकांमुळे हानी टाळण्यासाठी प्रशिक्षण

कृषी आयुक्तालयाचा पुढाकार; ३०० वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सहभाग

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : शेतकरी शेतीकामासाठी विविध प्रकारची रसायने, औषधे आणि कीटकनाशकांचा वापर करतात. यामुळे काहीवेळा विषबाधा आणि आरोग्यावर दुष्परिणाम जाणवतात. विषबाधा झालेल्या व्यक्तींवर तत्काळ उपचार व सुरक्षितेबाबत प्रशिक्षण महत्वाचे असून जिल्ह्यातील ६०० आरोग्य अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात ३०० वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले.

बुधवारी प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय, इगतपुरी तालुक्यातील धामणगाव येथील एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँण्ड रिसर्च सेंटर येथे कृषी आयुक्तालय, कोरटेव्हा ॲग्रो सायन्स आणि शिवार फाउंडेशन यांच्यावतीने तसेच जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली कीटकनाशकांचे दुष्परिणाम, त्यावर उपचार व सुरक्षिततेबाबत माहिती देण्यासाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.चारूदत्त शिंदे यांनी या प्रशिक्षणाबाबतची माहिती दिली. प्रशिक्षक डॉ. व्ही. व्ही. पिल्ले, स्टीवर्डशिप समिती प्रमुख डॉ. मनीष देशपांडे, जिल्हा गुण व नियंत्रण अधिकारी डॉ. राजेंद्र बागूल, अधीष्ठाता डॉ. जगन सूर्यवंशी आदींसह ३०० प्रशिक्षणार्थी वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

कार्यशाळेत प्रशिक्षक डॉ. पिल्ले यांनी कीटकनाशक किंवा तत्सम रसायनांमुळे जगात दरवर्षी दोन लाखांहून अधिक व्यक्तींचा मृत्यू होत असल्याची माहिती दिली.. शेतकऱ्यांनी कीटकनाशके फवारताना मुखपट्टी, हातमोजे, चष्मा, पादत्राणे वापरणे आवश्यक आहे. त्याबरोबर विषबाधा झालेल्या व्यक्तीला सुरक्षितपणे कसे वाचवावे. कोणत्या प्रकारची तत्काळ औषधे व उपाययोजना कराव्यात याची त्यांनी सविस्तर माहिती दिली. या प्रशिक्षणामुळे जनजागृती निर्माण होऊन विषबाधेच्या घटना अधिक कार्यक्षमतेने हाताळू शकतील आणि विषबाधेच्या घटनांमध्ये घट होईल, त्या रोखता येतील, अशी अपेक्षा डॉ. देशपांडे यांनी व्यक्त केली.

मदतवाहिनीवर संपर्क

कीटकनाशकांमुळे होणारी हानी टाळण्यासाठी प्रयत्नांचा भाग म्हणून वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. शेतकरी आणि डॉक्टरांनी कोणत्याही प्रकारची विषबाधेच्या घटना घडल्यास अथवा प्राथमिक उपाचारासंदर्भात माहिती, सल्ला मार्गदर्शन व मदत आवश्यक असल्यास ८९५५७७१११५ शिवार मदतवाहिनीवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

टेबल टेनिस स्पर्धेत विशेष खेळाडूंचा सहभाग

नाशिक येथे विशेष खेळाडूंसाठी आयोजित बाबा बोकील टेबल टेनिस स्पर्धेतील विजेत्यांसमवेत मान्यवर

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : शहरातील यशवंत व्यायामशाळा, यशविद्या फाउंडेशन, सक्षम नाशिक, स्पेशल ऑलिंपिक महाराष्ट्र नाशिक जिल्हा , विश्वास कम्युनिटी रेडियो यांच्या संयुक्त विद्यमाने आणि विश्वास बँक यांच्या सहकार्याने प्रथमच मानसिकदृष्ट्या अपंग खेळाडूंसाठी आयोजित बाबा बोकील टेबल टेनिस शिबिराचा समारोप आणि स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात झाले.

नाशिकचे ज्येष्ठ क्रीडा संघटक व मार्गदर्शक बाबा बोकील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ १७ वर्षांपासून टेबल टेनिस प्रशिक्षक तथा क्रीडा संघटक शशांक वझे यांच्या पुढाकाराने टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. स्पर्धेचे वैशिष्ट्ये म्हणजे स्पर्धा ही पारंपरिक स्वरुपात न घेता पाच वर्षांपासून अपंग खेळाडूंसाठी आयोजित करण्यात येत आहे. यावर्षीची स्पर्धा ही मानसिकदृष्ट्या अपंग खेळाडूंसाठी आयोजित करण्यात आली होती. जेणेकरून त्यांनाही नवीन खेळ शिकता येईल. खेळाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध होईल. स्पर्धेआधी टेबल टेनिसविषयक नियम, हा खेळ कसा खेळावा, यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात १४ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. शिबिरातील सरावात खेळाडूच्या बौद्धिक क्षमतेनुसार गट तयार करण्यात आले. त्यात ज्या खेळाडूला खेळ समजला, खेळता आला, असा एक गट. ज्यांनी शिबीर यशस्वीरित्या पूर्ण केले असा एक गट. असे नियोजन करण्यात आले. आणि सामने खेळविण्यात आले. उपांत्य फेरीत शिवम बोडके आणि मयुरी चौधरी यांच्यात झालेल्या अत्यंत अटीतटीच्या सामन्यात मयुरीने शिवमवर विजय मिळवित अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसर्या उपांत्य फेरीत नील मोरे आणि अभिषेक अहिरे यांच्यात झालेल्या सामन्यात नीलने अभिषेकलासरळ सेटमध्ये पराभूत करुन अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत नीलने मयुरीला हरवून विजय प्राप्त केला.

तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात शिवमने अभिषेकवर विजय मिळविला. पारितोषिक वितरणास यशवंत व्यायामशाळेचे अध्यक्ष दीपक पाटील, सक्षमचे सचिव मुकुंद रामदासी, संयोगिता गोगटे, रेडियो विश्वासचे केंद्र संचालक हरी कुलकर्णी, क्रीडा संघटक आनंद खरे , नितीन हिंगमिरे, रवींद्र कांबळे, स्पर्धा आयोजक तथा टेबल टेनिस प्रशिक्षक शशांक वझे उपस्थित होते.

दत्त जयंतीच्या पूर्वसंध्येला शहरातील गोदाकाठावरील एकमुखी दत्त मंदिराला विद्युत रोषणाई करण्यात आली होती. शहरातील एकमुखी असलेले दत्ताचे हे एकमेव मंदिर असल्याने दर्शनासाठी कायम गर्दी असते. (छायाचित्र- यतीश भानू)

मुंढेगाव आश्रमशाळेचे क्रीडास्पर्धेत यश

नाशिक : आदिवासी विकास विभागाच्या नाशिक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा नाळेगाव (ता. दिंडोरी) शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा येथे झाल्या. स्पर्धेत मुंढेगाव शासकीय इंग्रजी माध्यम निवासी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. हॅण्डबॉलमध्ये १४ व १७ वर्षाखालील गटात विजेतेपद, रिले प्रकारात १७ वर्षांखालील गटातील मुलींच्या संघाला उपविजेतेपद, वैयक्तिक गौरव कातोरेने गोळाफेकमध्ये सुवर्णपदक, ४०० मीटर धावणे प्रकारात माया गमेने प्रथम, ६०० मीटर धावणे प्रकारात डिंपल भोयेने तर २०० मीटर धावणे प्रकारात आयुष गुंबाडेने तृतीय क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा मार्गदर्शक मंगेश गमे, क्रीडा विभागप्रमुख दत्तात्रय पोट, अधिक्षिका गौरीनंदा पाटील, निर्मला नगराळे, अधीक्षक संतोष सोनवणे, गौरव डोके, कलाशिक्षक संजय दुर्गावाड, योगेश अहिरे यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची जळगाव येथे होणाऱ्या क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

स्वावलंबी नाशिक उपक्रमातंर्गत अपंग तपासणी शिबीर

नाशिक : जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या संकल्पनेतून स्वावलंबी नाशिक उपक्रमातंर्गत अपंग तपासणी शिबिरातून मिळणारे प्रमाणपत्र योजनांसाठी उपयोगी आहे, असे प्रतिपादन जिल्हा शासकीय रुग्णालयाचे शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे यांनी केले.

अपंग प्राथमिक तपासणी शिबीर कार्यक्रमप्रसंगी डॉ. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. शिबिरात वणी परिसरातील सुमारे २९० अपंग उपस्थित होते. या शिबिरासाठी वणीचे उपसरपंच विलास कड, डॉ. संदीप सूर्यवंशी, गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे, सहायक गटविकास अधिकारी भरत वेंदे, गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. युवराज देवरे, बालविकास प्रकल्प अधिकारी राकेश कोकणी उपस्थित होते. शिबिरात अंध, अस्थिव्यंग, कंपवात कर्णबधिर पूर्णतः बहुविकलांग आदी प्रकारातील संदर्भित अपंग बांधवांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. प्रमाणपत्रसाठी पात्र अपंगांमध्ये कर्णदोष ३७ पैकी ११, बौध्दिक अपंग ४३ पैकी ३९, अस्थिरोग अपंग १५० पैकी ९३, नेत्रविकार ६० पैकी २६, बौद्धिक अपंग याप्रमाणे २९० अपंग नोंदणीपैकी १९० अपंग यूडीआयडी अपंग प्रमाणपत्रासाठी पात्र ठरले.

रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेन्ट फायनान्स कॉर्पोरेशन लि. RELIGARE HOME LOANS

नोंदणीकृत कार्यालय: पहिला मजला, कार्यालय क्र. १०१, २डी/२३, झंडेवालन विस्तार, नवी दिल्ली-११००५५, भारत. कॉर्पोरेट ऑफिस: ८ वा मजला, मॅक्स हाऊस, ब्लॉक ए, डी. झा मार्ग, ओखला फेज ३, ओखला इंडस्ट्रियल इस्टेट, नवी दिल्ली-११० ०२०, भारत. फोन: +९१-११-४७३९ २५००. सीआयएन: यू७४८९९डीएल१९९३पीएलसी०५४२५९

ई-लिलाव/विक्री सूचना

मेसर्स रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेन्ट फायनान्स लिमिटेड (यापुढे **''सुरक्षित धनको/ आरएचडीएफसीएल''** म्हणून संदर्भित) यांच्याकडे गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेच्या सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा) आणि नियम ८(६) आणि ९(१) अंतर्गत ई-लिलाव विक्री करण्यासाठी सूचना देण्यात येत आहे. खाली नमूद केलेल्या कर्जदाराने सरफेसी कायदा २००२च्या कलम १३(२) अंतर्गत त्यांच्या अधिकृत अधिकाऱ्याने जारी केलेल्या तक्वात नमूद केलेल्या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सुरक्षित धनकोला कर्जाची रक्कम परतफेड करण्यात अपयशस्वी ठरले.

ज्याअर्थी सुरक्षित धनकोने, त्याच्या अधिकृत अधिकाऱ्याद्वारे त्याला मिळालेल्या अधिकारांनुसार, सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम २००२च्या नियम ८(१)च्या तरतुदीनुसार आणि सरफेसी कायदा २००२च्या कलम १३(४)च्या तरतुदीनुसार आणि त्याअंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून तक्वात नमूद केल्याप्रमाणे गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

ज्याअर्थी त्यानंतरही कर्जदाराने सुरक्षित धनकोला वरील कर्जाची रक्कम परतफेड करण्यात अपयशस्वी ठरले, तेव्हा सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने खालील अटी आणि शर्तीवर इच्छुक खरेदीदारांकडून खालील नमूद केलेल्या मालमत्तेसाठी बोली आणि लिलाव आमंत्रित करण्याच्या प्रक्रियेद्वारे **''जशी आहे जिथे आहे'', ''जशी आहे जी आहे'' आणि ''जेथे आहे तिथे आहे''** या आधारावर अनुसूचीत मालमत्ता विक्रयाचा निर्णय घेतला आहे :

कर्जदाराचे नाव आणि पत्ता	सूचना तारीख आणि ताबा तारीख	आरक्षित किंमत	ईएमडी
१. कृष्णलाल कांतिलाल बैरागी, कांतिलाल आणि रंजना कृष्णलाल बैरागी यांचा मुलगा, दोन्ही **राहणार :** एन९/जी१/४/१, महाजीवनदायिनी फ्लोरिंग मिल, औद्योगिक वस्ती स्टॉपजवळ, सणप्राताप चौक, सिडको, नाशिक, एमएच-४२२ ००९ **सध्येच येथे :** फ्लॅट नं. ६, ३रा मजला, बालाजी रेसिडेन्सी अपार्ट., प्लॉट नं.२, गट नंबर ३६०/२, कोणार्क नगर, जत्रा हॉटेलच्या मागे, आडगाव, नाशिक, एमएच. **सुरक्षित कर्ज (रु.मध्ये रक्कम): रु. ८,२०,४७१.१०** (रुपये आठ लाख वीस हजार चारशे एकात्तर आणि दहा पैसे फक्त) दि. २२.१२.२०२१ रोजीनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह.	२२.१२.२०२१ रोजी सरफेसी कायदा २००२च्या कलम १३(२) अंतर्गत जारी केलेली सूचना आणि सरफेसी कायदा २००२च्या कलम १३(४)च्या तरतुदीनुसार **०५.१०.२०२३ रोजी** अधिकृत अधिकाऱ्यामार्फत घेतलेला रचनात्मक/ भौतिक ताबा	**Rs. 8,00,000/-**	**Rs. 80,000/-**

मालमत्तेचे वर्णन : फ्लॅट क्र. ६ असलेली मालमत्ता, मोजमापे तिसऱ्या मजल्यावर ५०.१८ चौ.मी., बालाजी रेसिडेन्सी अपार्टमेन्टमध्ये, प्लॉट क्र. २वर बांधलेले मोजमापे २६.८.२५ चौ.मी. + टीडीआर क्षेत्रफळ ११०.०० चौ.मी. गट क्र. ३६०/२ बांधेर गाव आडगाव, ता. जि. नाशिक येथे नाशिक महानगरपालिका नाशिक, महाराष्ट्राच्या हद्दीमधील यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल.

मालमत्तेची तपासणी	: २३.१२.२०२५ स. ११.०० वा. ते दु. ०२.०० वा.पर्यंत.
बोली सादर करण्याची शेवटची तारीख	: २४.१२.२०२५ सायं. ०५.०० वा.पर्यंत.
ई-लिलावाची तारीख	: २६.१२.२०२५ स. ११.०० वा. ते दु. ०१.०० वा.दरम्यान प्रत्येकी ५ मिनिटांच्या वाढीसह

विक्रीच्या अटी आणि शर्ती : १) वरील मालमत्तेचे संपूर्ण वर्णन अधिकृत अधिकाऱ्याकडे उपलब्ध आहे, अधिकृत अधिकाऱ्याकडे तारीख आणि वेळ निश्चित केल्यानंतर मालमत्ता/ कागदपत्रांची तपासणी करता येईल. **२)** ई-लिलाव मेसर्स सीए इंडिया प्रायव्हेट लिमिटेडमार्फत प्लॉट क्र. ६८, गुडगाव, हरियाणा, पिन कोड-१२२ ००३ येथे ऑनलाइन केला जाईल. **३)** ई-लिलावात सहभागी होण्यापूर्वी, इच्छुक बोलीदारांनी वैध ई-मेल आयडी धारण करावा आणि **www.bankeauctions.com** पोर्टलवर त्यांची नावे नोंदवावीत आणि मेसर्स सीए इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून त्यांचा वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड घ्यावा. **४)** संभाव्य बोलीदार **मेसर्स सीए इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** (संपर्क व्यक्ती : **श्री. धरणी कृष्णा, मोबाइल- +९१ ९९४८९८२२२२,** Delhi@c1india.com किंवा Support@bankeauctions.com (हेल्पलाइन क्र. ७२९१९८११२४,२५,२६) यांच्याकडून ई-लिलावाबाबत ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. **५)** इसारा ठेव अनामत (ईएमडी) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने/ आरटीजीएस/ एनईएफटी फंड ट्रान्सफरद्वारे चालू खाते क्र. **५७५०००००१५११६४२,** बँकेचे नाव : **एचडीएफसी बँक,** लाभार्थीचे नाव : रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेन्ट फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, **आयएफएससी कोड : एचडीएफसी०००००७** यामध्ये जमा केली जाईल, कृपया लक्षात ठेवा की धनादेश/ डिमांड ड्राफ्ट ईएमडीसाठी स्वीकारला जाणार नाही. **६)** आरक्षित किंमतीपेक्षा कमी आणि/ किंवा ईएमडी रकमेशिवाय बोली स्वीकारल्या जाणार नाहीत, बोलीदार त्यांच्या पुढील बोलीची रक्कम प्रति लॉट ५००० रुपयांच्या पटीत वाढवू शकतात. **७)** यशस्वी बोलीदाराने बोली रकमेच्या २५% रक्कम (ईएमडीसह) त्याच दिवशी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने/ डीडी/ चेकद्वारे **''मेसर्स रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेन्ट फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड''** च्या नावे **दिल्ली** येथे देय जमा करणे आवश्यक आहे आणि उर्वरित रक्कम यशस्वी बोलीदाराने सुरक्षित कर्जदाराने विक्रीची पुष्टी केल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत भरावी. इच्छुक बोलीदारांनी भरलेल्या ईएमडी तसेच विक्री किमतीवर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. यशस्वी बोलीदाराने विक्रीच्या अटींचे पालन केले नाही किंवा कोणतीही कसूर केली तर ईएमडीची ठेव किंवा विक्री किमतीच्या २५% रक्कम 'आरएचडीएफसीएल' द्वारे जप्त केली जाईल. **८)** यशस्वी बोलीदार 'विक्री प्रमाणपत्र' नोंदणीसाठी महानगरपालिका किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणांना वैधानिक देणी/ कर/ बिले इत्यादी आणि मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इत्यादींसाठी देय शुल्कासह सर्व खर्च सहन करेल. **९)** सुरक्षित कर्जदार कोणत्याही प्राधिकरणाकडून किंवा इतर कोणत्याही कायद्यानुसार देऊ केलेल्या मालमत्तेसाठी किंवा इतर कोणत्याही देणीसाठी, म्हणजेच थकबाकी असलेले पाणी/ विद्युत देणी, मालमत्ता कर किंवा इतर शुल्क, जर असतील तर, कोणतीही परवानगी/ एनओसी मिळविण्याची कोणतीही जबाबदारी घेत नाही. **१०)** मालमत्तेसाठी कोणतेही थकबाकी, देणी, कर, व्हॅट, टीडीएस, जीएसटी, कायदेशीर अरो या अन्यथा, मालमत्तेच्या विक्रीवरील मुद्रांक शुल्क/ नोंदणी शुल्कासह शुल्क केवळ खरेदीदारानेच भरावे. **११)** बोलीदारांनी मालमत्तेवरील शुल्क/ भार/ वैधानिक देणी याबाबत गोपनीय चौकशी करावी आणि त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेचे मालकी हक्क, त्याची आणि दर्जा याबाबत स्वतःची खात्री करून घ्यावी. ऑनलाइन बोली सादर केल्यानंतर मालमत्तेवरील शुल्क, भार आणि इतर कोणत्याही बाबी इत्यादींबाबत कोणत्याही स्वरूपाचा दावा स्वीकारला जाणार नाही. **१२)** अधिकृत अधिकाऱ्याला कोणतेही कारण न देता कोणत्याही किंवा सर्व ऑफर/ बिड्स स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा विक्री स्थगित करण्याचा/ रद्द करण्याचा किंवा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय विक्रीच्या कोणत्याही अटीमध्ये बदल करण्याचा पूर्ण अधिकार आहे. **१३)** त्यांच्या माहितीनुसार आणि ज्ञानानुसार, **'आरएचडीएफसीएल'**ला **'आरएचडीएफसीएल'**च्याविरुद्ध विकल्पा जाणाऱ्या मालमत्तेवर कोणत्याही भारांची माहिती नाही. इच्छुक पक्षांनी त्यांच्या समाधानासाठी मालमत्तेचे स्वतःचे मूल्यांकन करावे. सुरक्षित धनको कोणत्याही प्रकारे वरील मालमत्तेच्या योग्यते/ हक्काची हमी देत नाही किंवा कोणतेही प्रतिनिधित्व करीत नाही.

इतर कोणत्याही माहितीसाठी, १८००१०३९७१९ / ९८६०२६६४११ / १८००३०९९७११ वर संपर्क साधा.
ई-मेल : customerservice@religare.com वावर वरील पत्त्यावर संपर्क साधता येईल.
सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेन्ट) नियम २००२च्या नियम ८(६) आणि ९(१) अंतर्गत १५ दिवसांची वैधानिक सूचना
कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाण ठेवणारे यांना लिलावापूर्वी वर नमूद केलेली रक्कम, अद्ययावत व्याज आणि पूरक खर्चासह भरण्याची सूचना देण्यात येत आहे, अन्यथा वर नमूद केलेल्या गहाणखत मालमत्तेचा लिलाव होईल आणि उर्वरित देणी, जर असतील तर, व्याज/ खर्चासह वसूल केली जातील. लिलावासाठी निश्चित केलेल्या तारखेला लिलावात बोली न मिळाल्यास, सुरक्षित धनकोला खासगी करारादे ही मालमत्ता कोणत्याही संभाव्य खरेदीदाराला वरील निश्चित केलेल्या आरक्षित किमतीवर किंवा त्यापेक्षा जास्त प्रमाणात विक्री करण्याची मुभा असेल. कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाण ठेवणाऱ्यांना सदर या सूचनेच्या तारखेपासून **७ (सात) दिवसांच्या** आत गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा ताबा घेताना लवार केलेल्या पंचनामा/ इन्व्हेन्टरी अहवालानुसार **याद्वारे पुनर्प्राप्त मालमत्तेत असलेल्या सर्व घरातील वस्तू/ वैयक्तिक वस्तू हलवाव्यात/ काढून टाकाव्यात,** असे आवाहन केले जात आहे. या सूचनेच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या निर्धारित कालावधीत घरगुती वस्तू/ वैयक्तिक वस्तू हलविण्यात अयशस्वी झालेल्या, कोणी कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाण ठेवणारे जोखीम, जबाबदाऱ्या आणि खर्चाच्या आधारावर ''जसे आहे, जेथे आहे, जे आहे तसे आहे आणि तिथे जे काही आहे या आधारावर'' ते काढून टाकण्यासाठी/ हस्तांतरित करण्यास/ विल्हेवाट लावण्यास बांधील असेल. या संदर्भात कोणत्याही पक्षाने उपस्थित केलेल्या कोणत्याही दाव्यासाठी कंपनी जबाबदार राहणार नाही.

ठिकाण : नाशिक
दिनांक : ०४.१२.२०२५
अधिकृत अधिकारी
मेसर्स रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेन्ट फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड

टीप : सरफेसी मागणी सूचना जारी केल्यानंतर भरलेली रक्कम, जर असेल तर, वसूली/ सेटलमेन्टच्या वेळी देय असलेल्या देय रकमेची खात्री करण्यासाठी मोजली जाईल.

pnb Housing Finance Limited

नोंदणीकृत कार्यालय: ९वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२ के. जी. मार्ग, नवी दिल्ली- ११०००१
फोन्स: ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट: www.pnbhousing.com

शाखा कार्यालय नाशिक: ४०७ व ४०८, पद्मा विश्वन लँण्डमार्क, तिफ्ट शॉरूमजवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, रावका कॉलनी, श्रमणपूर रोड, नाशिक- ४२२००२.

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, ''पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.''चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्सअंतर्गत आणि एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या रुल ८(१) च्या अनुपालनार्थ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनांच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार रकमेची परतफेड करण्याकरिता खालील ऋणकोंवर फर्मायिणाऱ्या प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार नमूद केलेल्या तारखेदिवशी मागणी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणकोंना आणि आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार नमूद केलेल्या तारखेदिवशी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्ट्च्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्यांना/ तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषकरून ऋणकोंना तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी उक्त मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि उक्त मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार कर्ज करारनाम्याच्या अनुसार रकमेच व त्यावरील व्याजाकरिता ''पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.''च्या आकारास्पद विषयाधीन असणार आहे.

लोन अकाऊंट नं.	ऋणको/ सह-ऋणकोचे नाव	मागणी सूचनेची तारीख	थकित रक्कम	ताबा घेतल्याची तारीख	गहाणवट मालमत्तेचे वर्णन
HOU/NSK/0717/ 414256 शाखा कार्यालय: नाशिक	श्री. सचिन बाजीराव गाडे व श्रीमती सचीता सचिन गाडे	२०.०९.२०२५	रु.१३,९४,३८६.५४/-(रुपये तेरा लाख चौऱ्याण्णव हजार तिनशे शहाऐंशी व पैसे चौपन्न फक्त)	२८.११.२०२५ (सांकेतिक)	सिंगल बिल्डिंग, तिसरा मजला, १३, वृंदावन, प्लॉट नं. ५९ ० ६०, सर्व्हे नं. २९८/१, वॉटर टँकसमोर, मोर्या अपार्टमेंटजवळ, प्रशांतनगर, पाथर्डी फाटा, पाथर्डी शिवार, नाशिक- ४२२०१०.

स्थळ: नाशिक, दिनांक: ०४.१२.२०२५
प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.

निडो होम फायनान्स लिमिटेड nido HOME FINANCE

(पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)
नोंदणीकृत कार्यालय : ५वा मजला, टॉवर ३, विंग "बी", कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०००७०.
प्रादेशिक कार्यालय : ऑफिस नं. ४०७-४१०, चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, सीटीएस नं. २६८७बी, गणेशखिंड रोड, भाम्बुर्डे, शिवाजी नगर, पुणे-४११०१६, महाराष्ट्र.

ई-लिलाव - १५ दिवसीय सांविधिक विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.

आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको, सह-ऋणको व हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की, याखाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्री कर्ज देणींच्या वसुलीपर्यंत जोडलेल्या तालिकेत नमूद केल्यानुसार रकमेच्या वसुलीकरिता **"जसे आहे जेथे आहे", जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे"** या तत्वावर करण्यात येणार आहे. उक्त मालमत्ता **"मेसर्स निडो होम फायनान्स लिमिटेड"**कडे **(पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)** ऋणको, सह-ऋणको व हमीदाराद्वारा लाभ घेतलेल्या कर्जाकरिता गहाण ठेवण्यात आली आहे. सुरक्षित धनकोने याखाली नमूद केलेल्या सुरक्षित मत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

अनु क्र.	ऋणको / सह-ऋणको / हमीदाराचे नाव	वसुलीची रक्कम	राखीव किंमत व इरठे	लिलावाची तारीख व वेळ
१.	दिपक भानुदास निकम (ऋणको) व प्रियांका दिपक निकम (सह-ऋणको)	रु. २१,८७,३९३/- (रुपये एकवीस लाख सत्त्याऐंशी हजार तिनशे त्र्याण्णव फक्त) एलएएन नं. : L0870STHL000005331570 करिता व रु. १,४२,२४९/- (रुपये एक लाख बेचाळीस हजार दोनशे एकोणपन्नास फक्त) एलएएन नं. : L087STLAP0000005331502502 करिता ०१.१२.२०२५ रोजीप्रमाणे + त्यावरील पुढील व्याज + विधि खर्च	रु. १६,१४,१५०/- (रुपये सोळा लाख चौदा हजार एकशे पन्नास फक्त) इसारा रक्कम ठेव :- रु. १,६१,४१५/- (रुपये एक लाख एकसष्ट हजार चारशे पंधरा फक्त)	२९.१२.२०२५ स. ११.०० व दु. १२.०० दरम्यान (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयं-विस्तारासह)
	पाहाणीची तारीख व वेळ : ०८.१२.२०२५ - स. ११.०० व दु. ०३.०० दरम्यान		प्रत्यक्ष ताबा घेतल्याची तारीख : १२.०६.२०२५	
	सुरक्षित मत्तेचे वर्णन : पुडील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्ता धारण केलेला फ्लॅट नं. ३, एरिआ मोजमापाचा ४८.७९ चौ.मी. व बिल्ट-अप एरिआ मोजमापाचा ३३.९४ चौ.मी. कार्पेट, "रुतुराज हाईट्